SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

## INTERNAL COMPLAINT COMMITTEE

ACADEMIC YEAR- 2022 – 2023

**TWO DAYS WORKSHOP OF AIF SKILL TRAINING PROGRAM 2022**

**Date: - 6th & 7th October 2022**

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे अंतर्गत तक्रार निवारण समिती, IQAC व अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींसाठी दोन दिवसीय 'डेल फ्यूचर वर्कस्पेस स्किल' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. ६ व ७ ऑक्टोंबर २०२२ रोजी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते.

दि. ६ ऑक्टोंबर २०२२ रोजी प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सरांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रशिक्षण "अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट, डेल व नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन" यांच्या सहकार्याने घेण्यात आला. भारतातील महिला, बालक व युवा यांच्यामध्ये प्रशिक्षणातून सकारात्मक बदल घडवून त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यात सक्षम करणे हा उद्देश्य अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट चा आहे. सदर प्रशिक्षण महाविद्यालयातील मुलींसाठी ठेवण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मास्टर ट्रेनर म्हणून श्री अभिजीत पाताडे व श्री विश्वास केदारी लागले होते. त्यांनी विद्यार्थीनींना 'परिचय पत्र' तयार करणे, आत्मविश्वास वाढवणे, मुलाखत देताना कसे बोलावे, एम एस वर्ड, एम एस एक्सेल अशा बऱ्याच विषयांवर प्रशिक्षण दिले.

श्री अभिजीत पाताडे यांनी मुलाखतीचे कौशल्यावर वैयक्तिकरित्या मार्गदर्शन करून, चलचित्रपट दाखवून व प्रत्यक्ष व्यासपीठावर उभे राहून संभाषण कौशल्य मुलींकडून करून घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

दि. ७ ऑक्टोंबर २०२२ रोजी समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर होते. डॉ. सुनील मामलकर, प्रा. अविनाश मेहेरकर, श्री अभिजीत पाताडे व श्री विश्वास केदारी मंचकावर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त करताना श्री अभिजीत पाताडे व श्री विश्वास केदारी सरांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढल्याची भावना व्यक्त केली. तसेच मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सरांनी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. एकूण १५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी करून प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नंदा मास्कर व आभार डॉ. प्रवीण ठेंग यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. चाटे, प्रा. भिसे, प्रा. राहाटे, प्रा. मनगटे, डॉ. चित्रा मोरे, प्रा. नागेश गट्टूवार, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.







# मुलींसाठी दोन दिवसीय 'डेल फ्युचर वर्कस्पेस स्किल' प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**मोताळा, ८ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, येथे तक्रार निवारण समिती, आय. क्यू. ए.सी. व अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींसाठी दोन दिवसीय 'डेल फ्युचर वर्कस्पेस स्किल' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ६ व ७ ऑक्टोबर २०२२ रोजी प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते. दिनांक ६ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रशिक्षण अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट, डेल व नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने घेण्यात आले. भारतातील महिला, बालक व युवा यांच्यामध्ये प्रशिक्षणातून सकारात्मक बदल घडून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यात सक्षम करणे हा उद्देश अमेरिकन इंडिया फाउंडेशन ट्रस्ट चा आहे. सदर प्रशिक्षण महाविद्यालयातील मुलींसाठी खासकरून अश्या महिलांसाठी ज्यांचे काम लागले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मास्टर ट्रेनर म्हणून अभिजित पाताडे व विश्वास केदारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना परिचय पत्र तयार करणे,आत्मविश्वास वाढवणे, मुलाखत देताना कसे बोलावे, एम् एस वर्ड, एम.एस एक्सेल अश्या बऱ्याच विषयांवर प्रशिक्षण दिले. अभिजीत पाताडे यांनी मुलाखती चे कौशल्यावर वैयक्तिक रित्या मार्गदर्शन करुन, चलचित्रपट दाखवून व प्रत्यक्ष व्यासपीठावर उभे राहून संभाषण कौशल्य मुलींकडून करुन घेऊन त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण केले. कार्यक्रमाचे समन्वयक वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रविण ठेंग हे होते. सहसंयोजक म्हणून तक्रार निवारण समितीच्या समन्वयक प्रा.नंदा मास्कर व डॉ. चित्रा मोरे



विद्यार्थिनी उपस्थित होत्या.दिनांक ०७ ऑक्टोबर २०२२ रोजी समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गजानन जाधव, प्रो. डॉ. सुनील मामलकर, प्रा. मेहरकर, अभिजित पाताडे व विश्वास केदारी मंचकावर उप– स्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करतांना श्री अभिजित पाताडे व विश्वास केदारी यांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढल्याची भावना व्यक्त केली व प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी त्यांच्यासाठी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नंदा मास्कर व आभार डॉ. प्रविण ठेंग यांनी मानले. त्यामध्ये अमेरिकन इंडिया फाउंडेशनच्या रुपाली पाटील, प्रज्योत घारत व धनंजय कुलकर्णी यांनी अनमोल सहकार्य केल्याबद्दल बद्दल यांचे विशेष आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रा. चाटे, प्रा. भीसे, प्रा. रहाटे, प्रा. मनगटे, डॉ. चित्रा मोरे व प्रा. नागेश गड्डूवार उपस्थित होते. या कार्यक्रमाची यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांचे